**न्यायालयीन प्रकरण**
**अतितातडीचे/ अतिमहत्त्वाचे**

महाराष्ट्र शासन
महसूल व वन विभाग
मादाम माका मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक,
मुख्य इमारत, १ ला मजला, मंत्रालय, मुंबई-४०० ०३२
**Email ID :-doj1.rfd@maharashtra.gov.in**

---

**क्र.न्यायाप्र-२०२२/प्र.क्र.१९६/(भाग-३)ज-१** **दिनांक : ०३ एप्रिल,२०२३**

**प्रति,**

१) विभागीय आयुक्त (सर्व)
२) जिल्हाधिकारी (सर्व)

**विषय:-** गायरान / शासकीय जमिनीवरील अतिक्रमणाबाबत संबंधितांना दयावयाच्या नोटीसचा नमुना.
मा. उच्च न्यायालय, मुंबई येथील सुओमोटो जनहित याचिका क्र.०२/२०२२

**संदर्भ:-** १) सुओमोटो पीआयएल ०२/२०२२ मधील मा. उच्च न्यायालय,मुंबई यांचे दि. १५ सप्टेंबर, २०२२ चे तसेच दि. ०६ ऑक्टोबर, २०२२ रोजीचे आदेश.
२) या कार्यासनाची क्र. न्यायाप्र-२०२२/प्र.क्र.१९६/ज-१, दि. ११ ऑक्टोबर,२०२२ रोजीची दोन पत्रे.
३) सहाय्यक सरकारी अभियोक्ता, उच्च न्यायालय, मुंबई यांचे पत्र क्र. GP/AS/MMP/१८८७७/२०२२, दि. ०७ डिसेंबर, २०२२ तसेच दि. ०८ डिसेंबर, २०२२

उपरोक्त विषयाधीन सुओमोटो जनहित याचिकेवरील सोमवार दि. २७ फेब्रुवारी, २०२३ रोजी झालेल्या सुनावणी वेळी मा. उच्च न्यायालय, मुंबई यांनी दिलेल्या निर्देशानुसार शासकीय / गायरान जमिनीवरील अतिक्रमण निष्कासित करण्याकरीता महाराष्ट्र जमीन महसूल संहिता, १९६६ च्या कलम-५० अन्वये दयावयाच्या निष्कासन नोटीसचा नमुना विहीत करुन तो सोबत जोडला आहे.



Scanned with Can

०२. सबब, आपल्या कार्यक्षेत्रातील शासकीय जमीन / गायरान जमिनीवरील अतिक्रमण निष्कासित करण्याकरीता सोबत जोडलेल्या विहीत नमुन्यातील नोटीस प्रमाणे, सर्व संबंधितांना आगामी ४ आठवडयात नोटीस देण्यात यावी. तसेच, त्यामध्ये नमूद केलेली कार्यपध्दतीस अनुसरुन, महाराष्ट्र जमीन महसूल संहिता, १९६६ आणि त्याखालील नियमांन्वये आणि शासनाचे प्रचलित धोरणानुसार सत्वर कार्यवाही करण्यात यावी.

०३. सदर निर्देशानुसार केलेल्या कार्यवाहीचा अनुपालन अहवाल सत्वर शासनास सादर करण्यात यावा, ही विनंती.

(रमेश चव्हाण)
**सह सचिव, महाराष्ट्र शासन**

**सोबत:- वरीलप्रमाणे.**

**प्रत:- माहिती व आवश्यक त्या कार्यवाहीकरिता अग्रेषित,**

१) मा. मंत्री (महसूल) यांचे खाजगी सचिव,०५ मजला, विस्तारित इमारत, मंत्रालय, मुंबई-३२
२) मा.अ.मु.स. (महसूल) यांचे वरिष्ठ स्वीय सहायक, महसूल व वन विभाग, मंत्रालय, मुंबई-३२
३) सरकारी अभियोक्ता (श्री. पी.पी. काकडे), मा. उच्च न्यायालय, जुना पीडब्ल्यू इमारत, मुंबई.
४) सहाय्यक सरकारी अभियोक्ता (श्री. म.म.पाबळे), मा. उच्च न्यायालय, जुना पीडब्ल्यू इमारत, मुंबई.
५) निवडनस्ती ज-१



Scanned with Can

**महाराष्ट्र जमीन महसूल संहिता, १९६६ च्या कलम - ५० अन्वये**

**निष्कासन नोटीस**

क्र. महसूल/टे-२/ जमीन----/अतिक्रमण निष्का./
अनधिकृत बांधकाम/_______________
तहसीलदार कार्यालय, /_______________
दिनांक-_______________

**प्रति,**

**श्री / श्रीमती,**
**पत्ता:-**

**विषय:-** **शासकीय / गायरान जमिनीवरील अतिक्रमण निष्कासित करणेबाबत**

**संदर्भ:-** १. महाराष्ट्र जमीन महसूल संहिता, १९६६ कलम ५० व १३
२. मा. सर्वोच्च न्यायालय, नवी दिल्ली यांचेकडील सिव्हील अपिल क्र. ११३/२०११@एलएलपी (सी) ३१०९/११ जगपाल सिंग व इतर विरुद्ध पंजाब राज्य व इतर याचिका आदेश दि. २८/०१/२०११
३.महसूल व वन विभाग, शासन निर्णय क्र. जमीन/०३/११/प्र.क्र.५३/ज-१, दि. १२/०७/२०११
४. मा. उच्च न्यायालय, मुंबई येथे दाखल Suo Moto Public Interest Litigation No. ०२ of २०२२ मधील दि. १५/०९/२०२२ व दि. ०६/१०/२०२२ रोजीचे आदेश.
५. नगर विकास विभाग , शासन निर्णय, क्र.एमयुएन२०१८/प्र.क्र.१९७ / नवि- १८,दिनांक -१७ नोव्हेंबर २०१८
६. ग्राम विकास विभाग, शासन निर्णय, क्र.प्रआयो २०१७/प्र.क्र.३४८/योजना-१०,दिनांक-१६ फेब्रुवारी, २०१८
७. ग्राम विकास विभाग, शासन निर्णय, क्र.प्रआयो-२०२१/प्र.क्र.८१/ योजना-१०,दिनांक-२२ ऑगस्ट, २०२२
८. महसूल व वन विभागाचे पत्र क्र. न्यायाप्र- २०२२/ प्र.क्र.१९६/ज-१, दिनांक ११ ऑक्टोबर २०२२
९. मा. विभागीय आयुक्त, __________यांचेकडील पत्र क्र__________________ दिनांक __________
१०. मा. जिल्हाधिकारी __________यांचे कडील पत्र क्र. __________ दि. __________
११. मा. उपविभागीय अधिकारी, __________ यांचेकडील पत्र क्र. __________दि. __________

ज्याअर्थी, सार्वजनिक वापरासाठी ग्रामपंचायतीकडे निहीत केलेल्या जमिनी तसेच गायरान जमिनीवरील अतिक्रमणाबाबत सिव्हील अपिल क्र. ११३२/२०११ @ एसएलपी (सी) ३१०९/२०११ जगपाल सिंग व इतर विरुध्द पंजाब राज्य व इतर या याचिकेवर मा. सर्वोच्च न्यायालयाने दिनांक २८/०१/२०११ रोजी दिलेल्या आदेशास अनुसरुन शासनाने दिनांक १२/०७/२०११ रोजी शासन निर्णय निर्गमित केला आहे.



Scanned with Can

**०२.** ज्याअर्थी, नगर विकास विभाग, शासन निर्णय क्र. एमयुएन-२०१८/प्र.क्र.१९७/नवि-१८, दिनांक. १७ नोव्हेंबर, २०१८, ग्राम विकास विभाग, शासन निर्णय क्र. प्रआयो-२०१७/प्र.क्र.३४८/योजना-१०, दि. १६ फेब्रुवारी, २०१८ अन्वये प्रधानमंत्री आवास योजने अंतर्गत लाभ मिळण्यास पात्र ठरत असलेल्या लाभार्थींची शासकीय जमिनीवरील अतिक्रमणे नियमानुकूल करण्याचा निर्णय घेतला आहे. तसेच, शासन निर्णय क्र. प्रआयो-२०२१/प्र.क्र.८१/योजना-१०, दिनांक २२ ऑगस्ट, २०२२ अन्वये "सर्वांसाठी घरे" या योजनेअंतर्गत बेघर व्यक्तींनी निवासी प्रयोजनासाठी शासकीय जमीन तसेच गायरान जमिनीवरील केलेली अतिक्रमणे नियमानुकूल करण्याचा / बेघर भूमिहीन लाभार्थ्यांना जमीन उपलब्ध करुन देण्याचा निर्णय घेतला आहे.

**०३.** ज्याअर्थी, सुमोटो जनहित याचिका क्र. ०२/२०२२ मध्ये मा. मुंबई उच्च न्यायालयाने दिनांक ०६/१०/२०२२ रोजीच्या आदेशान्वये महाराष्ट्र राज्यामधील गायरान जमिनीवरील केलेली अतिक्रमणे ही कोणत्याही परिस्थितीत या वर्षा अखेर निष्कासित करण्याचे निर्देश दिलेले आहेत.

**०४.** ज्याअर्थी, तलाठी सझा ________________ यांनी सादर केलेल्या शासकीय / गायरान जमिनीवरील अतिक्रमण धारकाचे यादीनुसार आमचे असे निदर्शनास आले आहे की, आपण मौजे ____________ , ता. ____________, जि. ____________ येथील भूमापन क्र. / गट क्र. ____________ या शासकीय जमीन / गायरान जमिनीवर निवासी / वाणिज्यिक / औद्योगिक / शेती व अन्य प्रयोजनार्थ अनधिकृतपणे कब्जा करुन अतिक्रमण केले आहे.

**०५.** ज्याअर्थी, महाराष्ट्र जमीन महसूल संहिता, १९६६ च्या कलम- ५० नुसार शासकीय जमिनीवरील अतिक्रमण निष्कासित करण्याचा अधिकार तहसीलदार यांना प्राप्त झाला आहे.

**०६.** त्याअर्थी, मी, ________________ (सक्षम अधिकाऱ्याचे पदनाम) आपणास कळवितो की. महसूल व वन विभाग, शासन निर्णय क्र. जमीन ०३/२०११/प्र.क्र.५३/ज-१, दिनांक १२ जुलै,२०११ तसेच नगर विकास विभाग , शासन निर्णय क्र. एमयुएन-२०१८/प्र.क्र.१९७/नवि-१८, दिनांक. १७ नोव्हेंबर, २०१८, ग्राम विकास विभाग, शासन निर्णय क्र. प्रआयो-२०१७/प्र.क्र.३४८/योजना-१०, दि. १६ फेब्रुवारी, २०१८ आणि शासन निर्णय क्र. प्रआयो-२०२१/प्र.क्र.८१/योजना-१०, दिनांक २२ ऑगस्ट, २०२२ किंवा शासनाच्या इतर कोणत्याही धोरणानुसार / तरतुदीनुसार आपण केलेले अतिक्रमित क्षेत्र संरक्षित होत असल्यास, त्याबाबतची कागदपत्रे व आपले म्हणणे समक्ष अथवा आपल्या प्रतिनिधी मार्फत या नोटीसीत नमूद केलेल्या उक्त कार्यालयात, सदरहू नोटीस मिळाल्याच्या दिनांकापासून ३० दिवसांच्या आत सादर करावे.

**०७.** तसेच, महाराष्ट्र जमीन महसूल संहिता, १९६६ चे कलम - ५० नुसार कळविण्यात येते की, मौजे ______________ येथील भूमापन क्र. / गट क्र. __________ या गायरान / गुरचरण / शासकीय जमिनीवर आपण केलेले अतिक्रमण हे प्रचलित कोणत्याही शासकीय धोरणान्वये संरक्षित होत असल्याचे आपणाकडून ३० दिवसांत उक्त नमूद तहसील कार्यालयास न कळविल्यास, आपण केलेले अतिक्रमण या नोटीसीच्या दिनांकापासून ६० दिवसांच्या आत आपण स्वत:हून काढून टाकावे व सदर जमिनीचा ताबा या कार्यालयाचे अधिनस्त मंडळ अधिकारी, __________ता. __________, जि. __________ यांचेकडे देण्यात यावा.



Scanned with Can

०८. वरीलप्रमाणे, गायरान / शासकीय जागेवरील आपण केलेले अतिक्रमण दूर करुन त्याचा ताबा मंडळ अधिकारी .........., ता......... जि.............. यांचेकडे न दिल्यास आपणास यानंतर कोणत्याही प्रकारची नोटीस न देता, आपले सदर अतिक्रमण / बांधकाम शासकीय खर्चाने निष्कासित करण्यात येईल व त्यासाठी येणाऱ्या खर्चाची रक्कम महाराष्ट्र जमीन महसूल संहिता, १९६६ मधील तरतुदीनुसार महसूलाची थकबाकी म्हणून आपले कडून वसूल करण्यात येईल, याची नोंद घ्यावी.

(________________________)

**तहसीलदार**

**प्रत:-**

१) गट विकास अधिकारी, पंचायत समिती, ________ ता. _________ जि. _________

२) उपायुक्त, ________ महानगरपालिका / मुख्याधिकारी _________नगरपालिका / नगरपंचायत

सदर नोटीसच्या अनुषंगाने आपणास विनंती करण्यात येते की, या नोटीस मधील संदर्भाधीन क्र. ५, ६ व ७ येथे नमूद शासन निर्णय आणि तसेच त्या त्या वेळी लागू असलेल्या शासनाच्या इतर प्रचलित धोरणानुसार उक्त नमूद अतिक्रमण करणाऱ्या व्यक्तीचे अतिक्रमण नियमानुकूल करणे पात्र असल्यास, त्याबाबत सविस्तर तपशीलासह माहिती, या नोटीसीत नमूद केलेल्या माझ्या कार्यालयाच्या उक्त पत्त्यावर सत्वर सादर करावी, ही विनंती.

(________________________)

**तहसीलदार**



Scanned with Can